I J R S S I S, Spl Issue (IV), March-2022 : 8-11

A Double-Blind Peer Reviewed Journal

OPEN ACCES

e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)

Original Article

Reg. No. : MH-NGP/0000167

INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES

© VMS RESEARCH FOUNDATIONwww.ijrssis.in

# सामान्य व्यक्तीची राजकीय जबाबदारी

प्रा. माधव तु. गुरनुले

सहायक प्राध्यापक व विभागप्रमुख

डॉ. खत्री महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर.

Corresponding Author : madhaogurnule@gmail.com

Communicated :20.02.2022 | Revision : 15.03.2022 Accepted :25.03.2022 | Published: 30.03.2022

**सारांश:**

भारतातील प्रत्येक सामान्य व्यक्ती राजकीय समाजाचा घटक आहे. भारतीय संविधानाने देशाचा नागरिक असणाऱ्या व्यक्तीला राहण्याचा आधिकार दिलेला आहे. ज्या राज्यातून नागरिकांना त्याचे मुलभूत अधिकार व हक्क दिले जातात. तेच राज्य आदर्श राज्य बनू शकते असे अनेक विचारवंतानी मत व्यक्त केले आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रत्येक भारतीय नागरिकांना प्रौढ मताधिकार दिला आहे. एक व्यक्ती, एक मत, एक मुल्य या तत्वावर आधारीत मताधिकार आहे.

संविधानाने प्रत्येक नागरीकाला समानतेचा, स्वातंत्र्याचा, शोषणाविरूध्दचा, धर्मस्वातंत्र्याचा, सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार व संविधानिक उपापयोजनाचा अधिकार दिलेला आहे. यासोबतचा कलम ४१ (क) मध्ये ११ मुलभूत कर्तव्याची जबाबदारी दिलेली आहे. देशात वाढती बेरोजगारी, महाग शिक्षण, अंधश्रध्दा, महागाई, लाचखोरी, दहशतवाद, नक्षलवाद अशी अनेक आव्हाने आहेत. २० एप्रिल १९९२ मध्ये झालेल्या ७३ व्या घटना दुरूस्तीने स्थानिक स्वराज संस्थांना संविधानिक दर्जा प्राप्त झाला आहे. निवडणूक घेण्याकरीता स्वतंत्र निवडणूक आयोग आहे.

संसद व राज्याच्या विधानसभेमध्ये प्रतिनिधी सामान्य जनतेचे प्रश्न मांडतात. त्याचप्रमाणे ग्रामीण भागात ग्रामसभा मध्ये चर्चाच्या माध्यमातून प्रश्न सोडविले जातात. त्यामुळे सामान्य व्यक्तीची मतदार म्हणून महत्वाची भूमिका आहे. मतदार म्हणून योग्य आणि लायक प्रतिनिधी निवडूण देणे ही प्रत्येक मतदाराची जबाबदारी आहे म्हणून विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन ठेवून कुठल्याही प्रलोभनाला बळी न पडता मताधिकाराचा वापर केला तरच आपली लोकशाही मजबूत व सूदृढ होईल.

म्हणून प्रत्येक व्यक्तीने स्वत: जबाबदार नागरिक बनावे. आपले कर्तव्य निष्ठेने पार पाडावे. तरच देशात निकोप समाजरचना निर्माण होईल व प्रत्येक नागरिकांचे भविष्य उज्वल होईल.

**बीजसंज्ञा:** नागरीक, मुलभूत अधिकार, मताधिकार, कर्तव्य, व्यक्तीस्वातंत्र्य, जबाबदारी.

**प्रस्तावना:**

भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले आणि २६ जानेवारी १९५० ला भारत खऱ्या अर्थाने प्रजासत्ताक राष्ट्र झाले. भारत संयुक्त राष्ट्रसंघाचे एक सभासद राष्ट्र झाले. भारताला एक स्वतंत्र सविधान मिळाले. भारतीय संविधान बनविण्याचे पूर्वी एक घटनासमिती बनविण्यात आली. राज्यघटना समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्रप्रसाद होते. तर मसुदा समिती चे अध्यक्ष भारतरत्न डॉ. बी.आर. आंबेडकर होते. भारतीय मुळ संविधानात ३९५ कलम असून १२ परिशिष्टे व २२ विभागात विभागलेले आहे. संविधानात नागरिकत्व, मुलभूत अधिकार, कर्तव्य राज्यकर्त्याचे अधिकार व जबाबदारी, प्रशासकाचे अधिकार व जबाबदारी आणि न्यायालयाची कार्यपध्दती ठरविण्यात आली. संसदेने कायदे कसे बनवावेत या विषयाचे विविध नियम बनविण्यात आले. यासोबत संविधानात सामान्य व्यक्तीची जबाबदारी काय असावी हे सुध्दा ठरविण्यात आले.

सामान्य नागरिकांना भारतीय संविधानात कलम १४ ते ३५ पर्यंत मुलभूत अधिकार दिलेले आहेत आणि ५१ (क) मध्ये ११ मुलभूत कर्तव्याचा समावेश करण्यात आलेला आहे. भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेत भारतीय राज्यघटना भारतीय लोकांनी बनविली असे स्पष्टपणे नमूद आहे. त्यामुळे भारतातील लोकांची राजकीय जबाबदारी निश्चितपणे वाढली आहे.

**सामान्य व्यक्तींना मिळालेले नागरिकत्व:**

इ.स. पूर्व ग्रीक काळात गुलामगिरीची पध्दत होती. सामान्य कष्टकरी व्यक्तीला गुलाम समजले जात असे. श्रीमंत, जमिनदार व मालक यांनाच नागरिकत्वाचे अधिकार होते भारतीय संविधानाचा भाग दुसरा अनुच्छेद ५ मध्ये नागरिकत्वा बाबत चर्चा केलेली आहे.

पुढील अटीची पूर्तता करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला भारतीय नागरिकत्व प्राप्त होत असते.

१. जी भारताच्या राज्यक्षेत्रात जन्मली होती.

२. जिच्या मातापित्यापैकी कोणीही एक भारताचा राज्यक्षेत्रात जन्मले होते.
३. जी अशा प्रारंभिच्या निकटपूर्वी किमान ५ वर्ष इतका काळ भारताच्या कार्यक्षेत्रात सामान्यत: निवासी आहे.
जी व्यक्ती भारताची नागरीक आहे अशा सर्व व्यक्तींना चांगले जीवन जगण्याचा कोणतेही पद भूषविण्याचा कोणताही व्यवसाय करण्याचा, कुठेही संचार करण्याचा अधिकार व स्वातंत्र्य आहे. या सर्व सोयीमुळे भारतातील प्रत्येक व्यक्ती त्याच्या कर्तृतवाने मोठा होऊ शकतो.

**भारतीय संविधानातील महत्वाचे तरतुदी:**

१. नागरिकत्व कलम ५
२. मुलभूत अधिकार कलम १४ ते ३५
३. राज्य धोरणाची निर्देशक तत्वे कलम ३६ ते ५१
४. मुलभूत कर्तव्य कलम ५१ क
५. प्रौढ मताधिकार कलम ३२६

**मुलभूत अधिकार कलम १४ ते ३५:**

भारतीय संविधानाने सर्वसामान्य नागरिकांना चांगले आणि सुरक्षित जीवन जगता यावे याकरीता मुलभूत अधिकार दिलेले आहे आणि या सर्व अधिकारांचे संरक्षण करण्याची जबाबदारी भारतातील उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयावर सोपविली आहे. त्यामध्ये:—

कलम १५ — समानतेचा अधिकार धर्म, वंश, लिंग, जात आणि जन्मस्थान या कारणावरून कोणालाही भेदभाव करण्यास मनाई आहे.
कलम १६ — नुसार राज्याच्या नियोजीत सार्वजनिक सेवामध्ये सर्वांना समान संधी उपलब्ध आहे.
कलम १७ — नुसार अस्पृश्यता नष्ट करण्यात आली आहे.
कलम १९ — नुसार स्वातंत्र्याचा अधिकार आहे.
कलम २१ — नुसार जिवीत व व्यक्तीगत स्वातंत्र्य आहे.
कलम २१ (अ) — नुसार शिक्षणाचा अधिकार आहे.
कलम २३ — नुसार शोषणाविरूध्दचा अधिकार आहे.
कलम २५ — नुसार धर्मस्वातंत्र्याचा अधिकार आहे.
कलम २९ — नुसार सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार आहे.
कलम ३२ — नुसार संविधानिक उपाययोजनेचा अधिकार आहे.

या कलमाला डॉ. बी.आर. आंबेडकर यांनी राज्यघटनेचा आत्मा असे म्हटले आहे. कलम ३२६ नुसार लोकसभा व राज्याच्या विधानसभा यांच्या निवडणूका प्रौढ मताधिकाराच्या तत्वावर होतील असे सांगितले आहे.

**स्वातंत्र्याचा अधिकार कलम (१८ ते २२)**

भारतीय संविधनाच्या कलम १९(१) अंतर्गत भारताच्या सर्व नागरिकांना (क) भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्य (ख) शांततेने व विनाशस्त्र एकत्र जमण्याचा (ग) संघ किंवा संस्था बनविण्याचा (घ) भारताच्या राजक्षेत्रात सर्वत्र मुक्तपणे संचार करण्याचा आणि (ड) भारताच्या राज्यक्षेत्रात कोणत्याही भागात राहण्याचा व स्थायीक होण्याचा अधिकार आहे.

देशातील प्रत्येक सर्वसामान्य व्यक्ती, सभा, समारंभ, साहित्य संमेलन, सार्वजनिक ठिकाणी भाषण देऊ शकतो, वर्तमानपत्र, प्रिंट मिडीया व इलेक्ट्रानिक मिडीया, व्हॉट्सॲप, ट्विटर, फेसबुक इत्यादी समाजमाध्यमात आपले विचार व्यक्त करून शकतो. त्याप्रमाणे संसद सदस्य व विधानसभा सदस्य म्हणून संसद व विधानमंडळामध्ये कायदे बनविण्याच्या प्रक्रियेत भाग घेऊ शकतो. स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये निवडून जाऊ शकतो. ग्रामसभेमध्ये भाग घेऊ शकतो.

अशा प्रकारे स्वातंत्र्याच्या अधिकारामुळे सर्वसामान्य व्यक्तीला त्याचा सर्वांगिण विकास करण्याची व देशाची सेवा करण्याची संधी मिळाली आहे.

**भारतीय नागरिकांना मिळालेला मतधिकार:**

पाश्चिमात्य देशात इंग्लंड सारख्या देशामध्ये मताधिकार प्राप्त होण्यासाठी मोर्चा, आंदोलन करावे लागले. भारतीय राज्यघटनेच्या कलम ३२६ नुसार प्रत्येक नागरिकाला प्रौढ मताधिकार प्राप्त झालेला आहे. या मताधिकाराचा वापर करून सामान्य जनता दर ५ वर्षांनी होणाऱ्या निवडणूकातून सर्वोच्च शासक, मंत्री निवडून देण्याची जबाबदारी पार पाडत असते.

देशातील राज्यकत्यांनी संविधानानुसार कायदे बनवावे, शासन चालवावे अशी अपेक्षा असते.तरच देशातील लोकांचे कल्याण होऊ शकते. मताधिकाराचा वापर स्वत:चा विवेक जागृत ठेवून केला पाहिजे अशी मतदाराकडून अपेक्षा असते मात्र सध्या मताचा वापर लाच घेऊन, पैसे घेऊन किंवा कुठली तरी लाच घेऊनच होत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे सामान्य नागरिकाची काळजी घेणारे खरे लोकप्रतिनिधी संसद, विधानसभा किंवा स्थानिक स्वराज्य संस्था मध्ये जाताना दिसत नाहीत. या प्रकारामुळे राजकारणाचे गुन्हेगारीकरण होत असते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ''एक व्यक्ती एक मत—एक मुल्य'' असे तत्व सांगितले परंतु दिवसेंदिवस मताचे अवमूल्यन होत असल्याचे दिसून येत आहे.

म्हणूनच मताधिकाराचा वापर विवेक जागृत ठेवून, डोकी शाबूत ठेवून केला जावा. तर देशाचा विकास होऊ शकतो.

**नागरीकांचे मुलभूत कर्तव्य:**

भारतीय राज्यघटनेच्या कलम ५१ (क) मध्ये ११ मुलभूत कर्तव्याचा समावेश आहे.

१. संविधानाचे पालन करणे आणि त्याचे आदर्श व संस्था राष्ट्रध्वज व राष्ट्रगीत यांचा आदर करणे.

२. ज्यामुळे आपल्या राष्ट्रीय स्वांतत्र्यलढण्यास स्फुर्ती मिळाली त्या उदात्त आदर्शाची जोपासना करून त्याचे अनुसरण करणे.

३. भारताची सार्वभौमता, एकता व एकात्मता उन्नत राखणे व त्याचे रक्षण करणे.

४. आव्हान केले जाईल तेव्हा देशाचे संरक्षण करणे व राष्ट्रीय सेवा बजावणे.

५. धार्मिक, भाषिक व प्रादेशिक किंवा वर्गीय भेदाचे पलीकडे जाऊन आखिल भारतीय जनतेमध्ये एकोपा व मातृभाव वाढीला लावणे, स्त्रियांच्या प्रतिष्टेला उणेपणा आणणाऱ्या प्रथांचा त्याग करणे.

६. आपल्या संमिश्र संस्कृतिच्या वारसाचे मोल जाणून तो जतन करणे.

७. अरण्य सरोवरे, नद्या व वन्य जीवसृष्टी यासुध्दा नैसर्गिक पर्यावरणाचे रक्षण करून त्यात सुधारणा करणे आणि सजीव प्राण्याबाबत दयाबुध्दी बाळगणे.

८. वैज्ञानिक दृष्टीकोन, मानवतावाद आणि शोधकबुध्दी व सुधारणावाद यांचा विकास करणे.

९. सार्वजनिक संपत्तीचे रक्षण करणे व हिंसाचाराचा निग्रहपूर्वक त्याग करणे.

१०. राष्ट्र सतत उपक्रम व सिध्दी यांच्या चढत्या श्रेणी गाठत जाईल अशाप्रकारे सर्व व्यक्तीगत व सामुदायिक कार्यक्षेत्रात पराकाष्टेचे यश संपादन करण्यासाठी झटणे.

११. ६ ते १४ वर्षे पर्यंतच्या बालकांचे आई–वडिल किंवा पालक त्यांच्या बालकांना किंवा पाल्यांना जो लागू असेल त्याप्रमाणे शिक्षणाची संधी उपलब्ध करून देतील.

हे प्रत्येक भारतीय नागरीकांचे कर्तव्य असेल.

सामान्य व्यक्ती समोरील आव्हाने:

**१. महागडे शिक्षण:**

शिक्षण महाग झाले आहे. सामान्य माणसाला शिक्षण घेणे कठीण झाले आहे. त्यामुळे अज्ञानी राहावे लागते काय हे एक आव्हान आहे.

**२. बेरोजगारी:**

भारतात प्रचंड प्रमाणात बेरोजगारी वाढली आहे. त्यामुळे रोजगाराची समस्या निर्माण झाली आहे.

**३. अंधश्रध्दा:**

देशात बनवाबनवी करणाऱ्या बाबांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. भारतातील इलेक्ट्रानिक माध्यमे विज्ञानाला प्रोत्साहन देणे सोडून अंधश्रध्देवर आधारीत मालिका दाखवित असतात. त्यामुळे सामान्य माणूस अंधश्रध्देला बळी पडतो.

**४. महागाई:**

भारतात जीवनावश्यक वस्तुंचे दर दिवसेंदिवस वाढत आहेत. त्या मानाने उत्पन्न वाढत नाही. त्यामुळे महागाईत जीवन कसे जगावे याचे आव्हान आहे.

**५. खाजगीकरण:**

सरकार सार्वजनिक उद्योगांचे खाजगीकरण मोठ्या प्रमाणात करीत आहे. त्यामुळे सेवा/नोकरी कमी होत आहे.

**६. लाचखोरी:**

निवडणूक आली की, राजकीय नेते लोकांना पैसे वाटून व इतर काही आमीषे देवून मते विकत घेत असतात. त्यामुळे आपली मते विकणे कसे थांबवावे हे सामान्य व्यक्तीपुढे फार मोठे आव्हान आहे.

**ग्रामसभेतील मतदारांची भूमिका:**

२० एप्रिल १९९२ मध्ये झालेल्या ७३ व्या घटनादुरूस्तीने ग्रामसभांना संविधानिक दर्जा प्राप्त झाला. गावातील सर्व प्रौढ नागरिक हे ग्रामसभेचे सभासद असतात. गावातील १८ वर्ष पूर्ण करणारा प्रत्येक मतदार हा ग्रामसभेचा आपोआपच सभासद होतो. जनतेचे सार्वभौमत्व या तत्वाचे पहिले उगमस्थान ग्रामसभा हेच आहे. ग्रामसभा म्हणजे प्रत्यक्ष लोकशाहीचा अभिनव प्रयोग होय.

अशा या ग्रामसभेमध्ये महिला व पुरूष व युवक सहभागी होत असतात. ग्रामपंचायतीने केलेल्या कार्याची माहिती ग्रामसभेत देण्यात येत असते. ग्रामसभेचे सभासद गावातील प्रश्न ग्रामसभेला विचारत असतात. ग्रामसभेत चर्चेच्या माध्यमातून प्रश्न सोडविले जात असतात.

ग्रामसभेच्या माध्यमातून सामान्य व्यक्तीला प्रश्न विचारण्याची संधी मिळत असते. राजकीय नेतृत्वाचा मार्ग ग्रामसभेतूनच जात असतो. सर्वसामान्य व्यक्ती संसदेत जावू शकत नाही. मात्र ग्रामसभेच्या माध्यमातून प्रत्येक व्यक्ती राजकीय प्रक्रियेत भाग घेऊ शकतो व प्रतिनिधीत्व करू शकतो.

**सामान्य व्यक्तीची राजकीय जबाबदारी:**

१. प्रत्येक १८ वर्षाच्या वरील व्यक्तीने स्वत:चे नाव मतदार म्हणून मतदार यादीत नोंदविले पाहिजे.

२. मतदार म्हणून नाव नोंदविल्यानंतर दर ५ वर्षांनी होणाऱ्या निवडणूकीमध्ये मतदार या नात्याने मतदान करणे.

३. ज्या नागरीकाला राजकीय क्षेत्रात काम करावयाचे आहे त्यांनी निवडणूकीला उभे राहिले पाहिजे.

४. निवडणूका पार पाडल्यानंतर लोकप्रतिनिधिवर नियंत्रण ठेवले पाहिजे.

५. ज्या सरकारला आपण निवडणूकीमध्ये निवडून पाठवितो त्यांचेवर नियंत्रण ठेवणेही मतदाराची जबाबदारी आहे.

६. सामान्य नागरिकांनी वर्तमानपत्रे, टेलिव्हिजन व इतर समाजमाध्यम यांचे माध्यमातून जनतेचे प्रश्न प्राधान्याने मांडले पाहिजे.

७. प्रत्येक व्यक्तीने मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे.

८. प्रत्येक व्यक्तीने निवडणूक ही उत्सव म्हणून साजरी केली पाहिजे.

९. सरकार जर सामान्य लोकांचे गरजाकडे दुर्लक्ष करीत असेल तर सरकारला सनदशिर मार्गाने व निवडणूकीत पराभूत करून धडा शिकविला पाहिजे.

जर सुदृढ व निकोप शासनव्यवस्था निर्माण करावयाची असेल तर प्रत्येक सामान्य व्यक्तीने स्वत:ची जबाबदारी ओळखून निष्ठेने कर्तव्याचे पालन केले पाहिजे. शासनव्यवस्थेवर नियंत्रण ठेवायचे असेल तर प्रत्येक व्यक्ती जागृत होणे गरजेचे आहे.

**संदर्भ :**

रा.ज. लोटे— भारतातील स्थानिक स्वशासन, पिंपळापुरे ॲन्ड कं. पब्लिशर्स, नागपूर. पृ.क्र. ५२

प्रदिप गायकवाड— भारताचे संविधान, समता प्रकाशन, नागपूर. पृ.क्र. २०९ ते २२४

डॉ. एस.जी. देवगावकर, डॉ. श्रीराम येरनकर — भारतीय राजकीय व्यवस्था, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर. पृ.क्र. ७४